# जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/आ.व्य./सीआर-26 दि. 06.04.2021 व दि. 11.04.2021.

---

DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

क्र.2020/आ.व्य./सीआर- 26
दिनांक:-23 /04/2021.

**विषय:- रुग्णालयांमध्ये कोविड-19 च्या रुग्णांना रुग्णालयांनी स्वत: रेमडेसिविर इंजेक्शन उपलब्ध करुन देणेबाबत व रुग्णाच्या नातेवाईकांना रेमडेसिविर इंजेक्शन आणण्यास न सांगणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यात कोविड-19 रुग्णांवर उपचार करणा-या कोविड-19 रुग्णालयांमध्ये (DCH, DCHC) शासनाकडून वेळोवेळी प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार रेमडेसिविर इंजेक्शनचा पुरवठा करण्यासाठी संदर्भ क्र. 4 च्या आदेशान्वये समिती स्थापन करण्यात आलेली आहे. ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्याला शासनाकडून प्राप्त होत असलेल्या रेमडेसिविर इंजेक्शन्सचे वाटप त्या-त्या रुग्णालयाच्या क्षमतेनुसार व मागणीनुसार करण्यात येत असून दैनंदिन वाटप करण्यात आलेल्या रेमडेसिविर इंजेक्शन्सची रुग्णालयनिहाय यादी उक्त समितीकडून प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र. 4 मध्ये नमूद आदेशांन्वये रेमडेसिविर इंजेक्शन्सच्या पुरवठ्याबाबत रुग्णालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना व कार्यपद्धती देण्यात आली आहे. त्यानुसार ज्या रुग्णालयामध्ये कोविड-19 चा रुग्ण उपचार घेत आहे त्या रुग्णालयांनी स्वत: त्या रुग्णास रेमडेसिविर इंजेक्शन व औषधे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

तथापि असे निदर्शनास येत आहे की, अनेक रुग्णालये कोविड-19 रुग्णाच्या नातेवाईकांना बाहेरुन रेमडेसिविर इंजेक्शन आणणेबाबत सक्ती करीत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील हेल्पलाईन क्रमांकावर याबाबत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत तसेच रुग्णालयांनी रुग्णाचे नातेवाईकांना बाहेरुन रेमडेसिविर इंजेक्शन आणण्यास सांगितल्यामुळे रेमडेसिविर इंजेक्शनच्या उपलब्धतेच्या चौकशीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येणा-या रुग्णाच्या नातेवाईकांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे.

त्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यात कोविड-19 च्या रुग्णांवर उपचार करणा-या सर्व रुग्णालयांना (DCH,

DCHC) याद्वारे असे आदेशित करण्यात येत आहे की, एखादया रुग्णाला रेमडिसिवीरची आवश्यकता असल्यास त्याची वैद्यकशास्त्रीय प्रमाणीकरणाची जबाबदारी संबधीत हॉस्पीटलची आहे. संदर्भ क्र. 4 मध्ये नमूद या कार्यालयाचे आदेशातील कार्यपद्धतीनुसार रुग्णालयांनी स्वत: कोविड-19 च्या रुग्णांना रेमडेसिविर इंजेक्शन व इतर औषधे उपलब्ध करून द्यावीत. रुग्णाच्या नातेवाईकांना रेमडेसिविर इंजेक्शन व इतर औषधे बाहेरुन आणण्यास सांगू नये. कोविड-19 अनुषंगिक संचारबंदीच्या काळात नातेवाईकांना अशा प्रकारे ठिकठिकाणी जायला सांगून त्यांनाही संसर्गाचा धोका निर्माण होत आहे. या सुचनांची तात्काळ अंमलबजावणी करावी. अन्यथा संबंधित रुग्णालयांवर "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020", आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

**प्रति,**

व्यवस्थापक/रुग्णालयप्रमुख,
**सर्व कोविड-19 रुग्णालये (DCH, DCHC) जि. उस्मानाबाद.**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
11. अध्यक्ष/सचिव, IMA उस्मानाबाद.
12. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD